# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८

## ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी, पुणे १७

## जाहीर प्रकटन

**ड-क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मनपा स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिका केंद्रात प्रवेश पक्रियेबाबत.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC), केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) तसेच विविध स्पर्धा परिक्षेत यशस्वी होण्यासाठी शहरातील व परीसरातील गरजू व होतकरु विदयार्थ्यांना शांत ठिकाणी अभ्यास करण्याची संधी मिळावी, यासाठी ड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पेठ क्र.३८, भुखंड क्र.१,औंध - रावेत रस्त्यालगत,रहाटणी येथे अभ्यासिका केंद्र सुरु करण्यात आले आहे.

**सदर अभ्यासिका केंद्रामध्ये खालील नमुद प्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबविणेत येईल.**

**प्राधान्य :-** म.न.पा.च्या स्पर्धा परिक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवेळी, पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील ५०% विद्यार्थ्यांना प्राधान्याने गुणानुक्रमे प्रथम प्रवेश देण्यात येईल. स्थानिक विद्यार्थी यांना प्रवेश दिल्यानंतर रिक्त जागेकरीता इतर विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे प्रवेश देण्यात येईल.

**प्रवेशा करिता वयोमर्यादा:-**

(१) ज्या स्पर्धा परिक्षेच्या अभ्यासाकरिता विद्यार्थी प्रवेश घेणार आहे त्या संबधित परिक्षा आयोगाने ठरवून दिलेली वयोमर्यादा प्रवेशाकरिता ग्राह्य धरणेत येईल.
(२) शासकिय सेवेत असणा-या व्यक्तींना वयोमर्यादेची अट नाही.

**स्पर्धा परीक्षा केंद्राचे सभासद होताना प्रवेश प्रक्रियेकरीता आवश्यक कागदपत्रे :-**

विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे पुरावा म्हणून साक्षांकीत झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

(१) कोणत्याही शाखेचे पदवी प्रमाणपत्र व गुणपत्रक किंवा पदवी परिक्षेच्या शेवटच्या वर्षात असले बाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.
(२) पासपोर्ट साईजचे २ फोटो
(३) कर्मचा-याचे ओळखपत्र (कर्मचा-याचे पाल्याकरीता)
(४) नगरसदस्य ओळखपत्र (नगरसदस्याचे पाल्याकरीता)
(५) रहीवासी पुरावा
    अ) मालमत्ता कराची पावती
    आ) आधार कार्ड
    इ) लाईट बील.

**परीक्षा केंद्र सभासद होताना प्रवेश प्रक्रिये करीता अटी/शर्ती –**

(१) एम.पी.एस.सी / यु.पी.एस.सी.परीक्षा देणारा विद्यार्थी कोणत्याही शाखेचा पदवीधर किंवा पदवी परिक्षेच्या शेवटच्या वर्षात शिकत असलेला असावा.
(२) एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी.परिक्षा देणा-या विद्यार्थ्यांनाच स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देणेत येईल.
(३) विद्यार्थ्याने स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करित असल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र देणे आवश्यक आहे.
(४) सभासदत्व स्विकारताना महानगरपालिकेच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील विहीत नमुन्यातील अर्ज सर्व पुराव्यांसह भरणे आवश्यक आहे. (सभासद अर्ज नमुना )
(५) स्पर्धा परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या केंद्राच्या आसन क्षमतेपेक्षा जास्त असल्यास उर्वरीत विद्यार्थ्यांना जागा रिक्त झालेनंतर गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात येईल. (पदवी परिक्षेचे गुण ग्राह्य धरण्यात येतील.)
(६) पिंपरी चिचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील ५०% रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना गुणानुक्रमाने प्रथम प्रवेश देण्यात येईल.
(७) म.न.पा. हद्दीतील विद्यार्थी संख्या केंद्राच्या आसन क्षमतेपेक्षा कमी असल्यास सदर जागांवर इतर विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे प्रवेश देण्यात येईल.
(८) म.न.पा. कर्मचा-यांचे पाल्यासाठी ५%जागा राखीव राहील.

(९) नगरसदस्यांचे पाल्यासाठी ५%जागा राखीव राहील.

(१०) सभासदत्व स्वीकारतांना सभासदाने प्रवेश फी, अनामत व वार्षिक वर्गणी किंवा कमीत कमी सहा महिन्यांची आगाऊ वर्गणी भरणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पुढील प्रत्येक वेळी वर्गणी भरतांनाही नियमानुसार आगाऊ वर्गणी भरणे आवश्यक आहे.

(११) सभासदत्व घेतले नंतर पुढील वर्गणी महिन्याच्या दहा तारखेपर्यंत भरावी. अन्यथा महिना अखेरीस थकबाकीदाराचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता कमी केले जाईल.

(१२) सभासदास सत्र (कालावधी) संपुष्ठात येणेपूर्वी सभासदत्व रद्द करावयाचे असल्यास त्यांनी भरलेली आगाऊ मासिक वर्गणी तसेच अनामत रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.

(१३) सतत तीन महीने विद्यार्थी अभ्यासिकेत अनुपस्थित असल्यास त्याचे सभासदत्व रद्द समजले जाईल. (आगाऊ वर्गणी भरलेली असली तरीही) अनामत रक्कम परत मिळणार नाही.

(१४) सभासदास सत्र (दोन वर्षेचा कालावधी) संपुष्ठात आल्यानंतर पुढील दोन महीन्याचे आत अनामत रकमेची मुळ पावती व आवश्यक कागदपत्रे जमा करणे अनिवार्य आहे. अन्यथा कोणत्याही परिस्थितीत अनामत रक्कम परत केली जाणार नाही.

(१५) सभासद होते वेळी सभासदाने स्वतःचा संपूर्ण पत्ता जवळच्या खुणेसह देणे आवश्यक आहे. तसेच पत्ता बदलला असल्यास त्याची लेखी माहिती संबंधीत स्पर्धा परिक्षा केंद्रास कळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची / सभासदाची राहिल.

बॅचचा कालावधी -

विद्यार्थ्यांचा प्रवेश सत्राचा कालावधी विद्यार्थ्यांच्या प्रवेश दिनांकापासून पुढे दोन वर्षे राहिल. तदनंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देता येणार नाही.

स्पर्धा परिक्षा केंद्र वर्गणी

स्पर्धा परिक्षा केंद्राची मासिक वर्गणी, प्रवेश फीव अनामत फी ठरविण्याचा अधिकार मा.महापालिका सभेस राहील.वर्गणी - अनामत फी र.रू. १,०००/- (र.रू.एक हजार फक्त). प्रवेश फीर.रु. ५०/-मासिक फी र.रू.१००/-इतकी राहील. स्पर्धा परिक्षा केंद्राची वर्गणी वार्षिक किंवा कमीतकमी सहा महिन्यांची आगाऊ भरणे आवश्यक आहे.

अनामत परतावा

अनामत रक्कम रु.१०००/-.

सदर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्रात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विदयार्थ्यांकडून दिनांक २२/०४/२०२२ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागविणेत येत आहेत. विहित मुदतीत वा विहित नमुन्यातीलच अर्ज ग्राहय धरणेत येईल.

**अर्ज स्विकारणेची वेळ:-** सकाळी १०.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत.

**ठिकाण:-** राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ अभ्यासिका केंद्र,
पेठ क्र.३८, भुखंड क्र.१,औंध - रावेत रस्त्यालगत,रहाटणी – १७

सही/-
(उल्हास जगताप)
**अतिरिक्त आयुक्त (३)**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११०१८**

क्रमांक - क्र. डक्षेका/०२/कावि/२४/२०२२
दिनांक – ०४/०३/२०२२

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिका**

**सभासद अर्ज**

प्रति,

मा. ग्रंथपाल

------------------------

स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

रहाटणी - १७

**विषय - स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिकेचे सभासदत्व मिळणे बाबत...**

**महोदय,**

मी आपल्या स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिकेचा सभासद होऊ इच्छितो. मी स्पर्धा परिक्षा केंद्रा संबंधी नमूद करण्यात आलेल्या खालील अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. माझ्या संबंधीची पुर्ण सत्य माहिती सोबत देत आहे. सदर माहितीमध्ये बदल झाल्यास अथवा माझा पत्ता बदलल्यास सदर बदल मी आपणास त्वरीत कळवीन. आपल्या नियमानुसार द्यावयाची अनामत रक्कम, प्रवेश फी व मासिक /त्रैमासिक/वार्षिक वर्गणी मी अर्जासोबत जमा करित आहे. तरी कृपया मला स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिकेचे सभासदत्व मिळावे, ही विनंती.

आपला / आपली विश्वासू,

(नाव -                                        )

दिनांक -     /     /२०

**(कार्यालयीन वापरासाठी)**

श्री./श्रीम.-----------------------------------------सभासद फी---------------------------याजकडून अनामत

र.रू.-------------------------------पावती क्र.-------------------- दिनांक- / /२० अन्वये प्राप्त झाले.

ग्रंथपाल
स्पर्धा परिक्षा केंद्र व अभ्यासिका

---

**वैयक्तिक माहिती**

१) संपुर्ण नाव -----------------------------------------------------------------------------------------------------

२) जन्म तारीख-----------------------वय--------------------वर्षे---------------------------------------------------

३) शिक्षण----------------------------------------------------------------------------------------------------------

४) जात प्रवर्ग--------------------------------------------------------------------------------------------------

५) कायम पत्ता------------------------------------------------------------------------------------------------------

६) स्थानिक पत्ता---------------------------------------------------------------------------------------------------

७) मोबाईल नंबर-------------------------------- ई मेल---------------------------------------------------------

८) शिक्षण घेत असल्यास - ------------------------------------------------------------------------------------

९) महाविद्यालयाचा दुरध्वनी क्र.------------------------------------------------------------------------------

**नोकरी करत असल्यास**

१०) धारण केलेले पद-----------------------------------------------------------------------------------------

११) कार्यालय प्रमुखाचे नाव--------------------------------------------------------------------------------

१२) व्यवसायाचा पत्ता---------------------------------------------------------------------------------------

१३) कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक----------------------------------------------------------------------------

१४) कोणत्या स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणार त्याचा तपशिल --------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------------------------------

**<u>सोबत सादर केलेली कागदपत्रे-</u>**

१) २ फोटो
२) लाईटबील
३) आधारकार्ड
४) मालमत्ता कराची पावती
५) जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (फक्त अण्णाभाऊ साठे स्पर्धा परिक्षा केंद्र, यमुनानगर करीता)
६) पदवी प्रमाणपत्राची किंवा गुणपत्रिकेची प्रत
७) कर्मचा-याचे ओळखपत्र (कर्मचा-याचे पाल्याकरीता)
८) नगरसदस्याचे ओळखपत्र (नगरसदस्याचे पाल्याकरीता
९) जातीचा दाखला (फक्त अण्णाभाऊ साठे स्पर्धा परिक्षा केंद्र, यमुनानगर करीता)

विद्यार्थ्याची सही

(नाव )

<u>विद्यार्थ्याने द्यावयाचे स्वयंघोषणापत्र</u>

प्रति,

ग्रंथपाल

----------------------------------स्पर्धा परिक्षा केंद्र

मी ------------------------------------------ आपणांस असे लिहून देतो/देते की मी --------------------------- स्पर्धा परिक्षा केंद्रात सभासदत्व घेऊ इच्छितो. मी ------------------- . स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करित असून मला आपले स्पर्धा परिक्षा केंद्रात प्रवेश मिळावा ही नम्र विनंती. स्पर्धा परिक्षा केंद्रातील अटी व शर्तींचे मी तंतोतंत पालन करीन.

आपला /आपली विश्वासू

( नाव - )